DHEPN-MVI1012/269/2024-COLLWG1 1/1858563/20

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६

Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९९

DHEPN-MVI१०१२/२६९/२०२४-COLLWG१/ ई. कॉम्प. नं. ८७९८४८

परिपत्रक

विषय: राज्य सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" लागू करण्याबाबत.

वाचा: १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४/विशि ५ दिनांक १६.१०.२०२३

२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. १४ / विशि ५ दिनांक २८.११. २०२३

३. शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०२६/ई ६६९४६४/विशि ५ दि. २५.०२.२०२६

उपरोक्त विषयाबाबत, शासन निर्णय दि. २५.०२.२०२६ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील सार्वजनिक विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कार्यान्वित "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी वैयक्तीक अपघात विमा (Personal Accident Insurance) याद्वारे **"अनिवार्य "** करण्यात आली आहे. मात्र ज्या विद्यापीठाकडील विमा योजनेद्वारे कमी रकमेच्या हप्त्यातून यापेक्षा जास्त रकमेचे संरक्षण मिळत असेल तर त्याबाबत नोडल अधिकारी म्हणून संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या सहमतीने त्या विद्यापीठास त्यांची योजना चालू ठेवता येईल. तथापी "स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना" अंतर्गत असलेला विद्यार्थी वैद्यकीय विमा (Medical Insurance) पुर्वीप्रमाणेच "पूर्णपणे ऐच्छिक" असेल. त्यानुषंगाने सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठांनी आवश्यक कार्यवाही करावी.

To,
प्रा. आपटे सॅम.
श्री. जगताप सर - असोसिएट.
HOD - अधिकारी

30/1/26.

Inward No. : 618
Date : 03/10/2026

१. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर सदरहु योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

२. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात यावी.

३. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर क्रमांकावर संबंधित प्रतिनिधींशी संपर्क करावा. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

सोबत- वरीलप्रमाणे.

Digitally signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 22-04-2026 13:18:49

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रति,

कुलसचिव,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे

प्रत-

१. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना आवश्यक कार्यवाहीस्तव.